## MAHARASHTRA ACT No. XL OF 1994.

## THE HINDU SUCCESSION (MAHARASHTRA AMENDMENT) ACT, 1994.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती दिनांक २५ नोव्हेंबर १९९४ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

प्रतिमा उमरजी,
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XL OF 1994.

## AN ACT FURTHER TO AMEND THE HINDU SUCCESSION ACT, 1956 IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.

[राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राजपत्रात" दिनांक ६ डिसेंबर १९९४ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला]

## सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०.

### हिंदू उत्तराधिकार अधिनियम, १९५६ महाराष्ट्र राज्याला लागू करताना त्यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.

**ज्याअर्थी**, भारताच्या संविधानाने कायद्यापुढे समानता हा एक मूलभूत अधिकार म्हणून उद्घोषित केला आहे;

**आणि ज्याअर्थी**, केवळ स्त्रीत्वाच्या कारणावरून सहदायकी मालकीतून कन्येला वगळणे हे सांविधानिक महादेशाविरुद्ध आहे;

**आणि ज्याअर्थी**, अशाप्रकारे कन्येला वगळण्यात आल्याने सामाजिकदृष्ट्या घातक हुंडा पद्धती तिच्या अनुषंगाने येणाऱ्या सामाजिक अनिष्टांसह निर्माण झालेली आहे;

**आणि ज्याअर्थी**, हिंदू समाजातील स्त्रियांचा स्थितीसुधारही करतील अशा ठाम उपाययोजना करून हुंड्याच्या या अपायकारक पद्धतीचे निर्मूलन करणे आवश्यक आहे;

**आणि ज्याअर्थी**, महाराष्ट्र शासनाने महिलांच्या कल्याणास चालना देण्याच्या दृष्टीने अलीकडेच एक धोरण जाहीर केले आहे;

आणि ज्याअर्थी, महिलांसाठी असलेल्या उक्त धोरणामध्ये, इतर गोष्टींबरोबर, मिताक्षरा कायद्याने नियंत्रित करण्यात येत असलेल्या संयुक्त हिंदू कुटुंबातील सहदायकाच्या कन्येला सहदायकीचा हक्क प्रदान करण्याची तरतूद आहे ;

आणि ज्याअर्थी, हिंदू उत्तराधिकार अधिनियम, १९५६ महाराष्ट्र राज्यास लागू करताना उपरोक्त प्रयोजनासाठी त्यात आणखी सुधारणा करणे आवश्यक आहे असे वाटते; **त्याअर्थी** भारतीय गणराज्याच्या पंचेचाळिसाव्या वर्षी याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ. १. या अधिनियमास, हिंदू उत्तराधिकार (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, १९९४ असे म्हणावे.

(२) तो २२ जून १९९४ रोजी अंमलात आला असल्याचे समजण्यात येईल.

सन १९५६ चा ३० क्रमांक ३० मध्ये प्रकरण दोन-अ समाविष्ट करणे. २. हिंदू उत्तराधिकार अधिनियम, १९५६ (ज्याला यात यापुढे "मुख्य अधिनियम" म्हणून संबोधण्यात आले आहे) महाराष्ट्र राज्यास लागू करताना त्याच्या कलम २९ नंतर पुढील प्रकरण समाविष्ट करण्यात येईल.

"प्रकरण २-क

उत्तरजीवित्वाद्वारे उत्तराधिकार

२९-क. या अधिनियमाच्या कलम ६ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,—

सहदायकी संपत्तीमध्ये कन्येला समान हक्क असणे. (एक) मिताक्षरा कायद्याने नियंत्रित केल्या जाणाऱ्या संयुक्त हिंदू कुटुंबामध्ये, सहदायकाची कन्या ज्या रीतीने पुत्र सहदायाद होतो त्याच रीतीने, जन्मापासून तिच्या स्वत:च्या हक्कामुळे सहदायाद होईल आणि तिला ती पुत्र असती तर उत्तरजीवित्वाच्या तत्त्वानुसार दावा सांगण्याच्या अधिकारासह जे अधिकार मिळाले असते ते अधिकार सहदायकी संपत्तीमध्ये असतील, आणि ती त्यांच्या संबंधात पुत्र म्हणून जी दायित्वे व नि:समर्थता असतात ती दायित्वे व नि:समर्थता यांना अधीन असेल ;

(दोन) खंड (१) मध्ये निर्देशिलेल्या संयुक्त हिंदू कुटुंबातील वाटणीच्या वेळी सहदायकी संपत्तीची वाटणी अशाप्रकारे करण्यात येईल की, पुत्राला वाटून देण्यायोग्य असेल तेवढाच हिस्सा कन्येला वाटून देण्यात येईल :

परंतु, पूर्वमृत पुत्र किंवा पूर्वमृत कन्या वाटणीच्या वेळी हयात असता किंवा असती तर त्याला किंवा तिला वाटणीच्या वेळी जो हिस्सा मिळाला असता तो हिस्सा अशा पूर्वमृत पुत्राच्या किंवा अशा पूर्वमृत कन्येच्या हयात अपत्याला वाटून देण्यात येईल :

परंतु असे की, पूर्वमृत पुत्राचे किंवा पूर्वमृत कन्येचे पूर्वमृत अपत्य वाटणीच्या वेळी हयात असते तर अशा अपत्याला वाटून देण्यायोग्य असा हिस्सा प्रकरणपरत्वे पूर्वमृत पुत्राच्या किंवा पूर्वमृत कन्येच्या अशा पूर्वमृत अपत्याच्या अपत्याला वाटून देण्यात येईल ;

(तीन) खंड (१) च्या तरतुदींच्या आधारे हिंदू स्त्री ज्या कोणत्याही संपत्तीस हक्कदार होते की संपत्ती ती स्त्री सहदायकी मालकी तत्त्वाच्या आनुषंगिकांसह धारण करील आणि ती संपत्ती, या अधिनियमामध्ये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, तिच्याकडून मृत्युपत्राद्वारे किंवा मृत्युपत्रानुसार अन्य व्यवस्था करून विल्हेवाट करण्याजोगी असल्याचे मानण्यात येईल ;

१९९४ चा महा. ४०. (चार) या प्रकरणामध्ये अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट हिंदू उत्तराधिकार (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, १९९४ याच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी विवाह झालेल्या कन्येला लागू होणार नाही;

१९९४ चा महा. ४०. (पाच) हिंदू उत्तराधिकार (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, १९९४ याच्या प्रारंभाच्या तारखेपूर्वी अंमलात आलेल्या वाटणीला खंड (दोन) मधील कोणतीही गोष्ट लागू असणार नाही.

**मृत्यूनंतर हितसंबंध उत्तरजीवी सदस्यांकडे प्रक्रांत होणे.**

१९९४ चा महा. ४०. २९ख. मृत्यूसमयी कलम २९-क च्या तरतुदींच्या आधारे मिताक्षरा सहदायकी संपत्तीत हितसंबंध असलेली एखादी हिंदू स्त्री हिंदू उत्तराधिकार (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, १९९४ याच्या प्रारंभाच्या तारखेनंतर मृत्यू पावली तर त्या संपत्तीतील तिचा हितसंबंध उत्तरजीवित्वाच्या तत्त्वानुसार सहदायकीतील उत्तरजीवी सदस्यांकडे प्रक्रांत होईल, या अधिनियमानुसार नव्हे :

परंतु, मृत व्यक्तीच्या मागे कोणतेही अपत्य किंवा पूर्वमृत अपत्याचे अपत्य हयात असेल तर मिताक्षरा सहदायकी संपत्तीमधील मृताचा हितसंबंध या अधिनियमाखाली प्रकरणपरत्वे मृत्युपत्रीय किंवा अमृत्युपत्रीय उत्तराधिकारानुसार प्रक्रांत होईल, उत्तरजीवित्वाच्या तत्त्वानुसार नव्हे;

**स्पष्टीकरण एक.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ, हिंदू मिताक्षरा सहदायाद स्त्रीचा हितसंबंध हा, तिच्या मृत्यूच्या निकटपूर्वी संपत्तीची वाटणी झाली असती तर तिला वाटून देण्यात आला असता तेवढा त्या संपत्तीतील हिस्सा असल्याचे मानले जाईल—मग वाटणी होण्याची मागणी करण्यास ती हक्कदार असो वा नसो.

**स्पष्टीकरण दोन.**—या कलमाच्या परंतुकात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे, मृताच्या मृत्यूपूर्वी सहदायकीपासून जो किंवा जी स्वत: विभक्त झाला किंवा झाली असेल तो किंवा ती अथवा त्याच्या किंवा तिच्या वारसांपैकी कोणीही त्यात निर्दिष्ट केलेल्या हितसंबंधातील हिश्श्यावर दावा सांगण्यास विनामृत्युपत्रितेमुळे समर्थ होते असा त्या गोष्टीचा अर्थ लावला जाणार नाही.

**विवक्षित बाबतीत संपत्ती संपादन करण्याचा अधिमानी अधिकार.**

१९९४ चा महा. ४०. २९ग. (१) जेथे, हिंदू उत्तराधिकारी (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, १९९४ याच्या प्रारंभाच्या दिनांकानंतर, अकृतमृत्युपत्र व्यक्तीच्या कोणत्याही स्थावर संपत्तीतील अथवा त्याने किंवा तिने—मग एकट्याने असो वा इतरांच्या समवेत असो—चालवलेल्या कोणत्याही धंद्यातील हितसंबंध कलम २९-क किंवा कलम २९-ख खाली दोन किंवा अधिक वारसदारांकडे प्रक्रांत होईल, आणि अशा वारसदारांपैकी कोणाही एकाने संपत्तीतील किंवा धंद्यातील त्याचा किंवा तिचा हितसंबंध हस्तांतरित करावयाचे योजल्यास, हस्तांतरणासाठी योजलेला हितसंबंध संपादन करण्याचा अन्य वारसदारांना अधिमानी अधिकार असेल.

(२) मृताच्या संपत्तीतील कोणताही हितसंबंध कोणत्या प्रतिफलाच्या बदल्यात या कलमाखाली हस्तांतरित करता येईल, ते पक्षांमधील कोणत्याही कराराच्या अभावी, न्यायालयाकडे त्याबाबत अर्ज करण्यात आल्यावर त्याच्याकडून निर्धारित केले जाईल, आणि जर तो हितसंबंध संपादन करण्याचे योजणारी कोणतीही व्यक्ती अशा प्रकारे निर्धारित केलेल्या प्रतिफलाच्या बदल्यात तो संपादन करण्यास राजी नसेल तर, अशी व्यक्ती अर्जाचा किंवा त्यास आनुषंगिक असलेला सर्व खर्च देण्यास दायी असेल.

(३) जर या कलमाखाली हितसंबंध संपादन करू इच्छिणारे दोन किंवा अधिक वारसदार असतील तर, जो वारसदार हस्तांतरणासाठी सर्वाधिक प्रतिफल देऊ करील त्याला अधिमान दिला जाईल.

**स्पष्टीकरण.**—या कलमात, "न्यायालय" याचा अर्थ, ज्याच्या अधिकारितेच्या सीमांच्या आत ती स्थावर संपत्ती असेल किंवा तो धंदा चालवला जात असेल ते न्यायालय असा आहे व राज्य शासन याबाबत राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा अन्य कोणत्याही न्यायालयाचा त्यात समावेश आहे.".

विवक्षित वाटण्या रद्दबातल असणे. ३. मुख्य अधिनियमामध्ये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी २२ जून १९९४ रोजी किंवा त्यानंतर आणि हा अधिनियम राजपत्रात प्रसिद्ध होण्याच्या दिनांकापूर्वी संयुक्त हिंदू कुटुंबाच्या सहदायकी संपत्तीच्या संबंधात कोणतीही वाटणी करण्यात आली असेल आणि अशी वाटणी या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या तरतुदींनुसार नसेल त्या बाबतीत, अशी वाटणी रद्दबातल असल्याचे व ती नेहमीपासून तशीच असल्याचे मानण्यात येईल.

(यथार्थ अनुवाद)

**प. ग. पाटील,**

भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.